नि.फौ.ख.क्र. १२६/२०२२
सरकार वि. अतुल
नि.क्र.३७

साक्षीदार क्र **०४** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–प्रविण लक्ष्मण अंबाघडे
वय ५० वर्ष, व्यवसाय–खाजगी
राह.मानोरी,तह.उमरेड, जि.नागपुर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.व्ही.यु.मिरचे यांच्या मार्फत**

**१.** पोलिसांनी मला पंच म्हणून हजर राहण्यासाठी दि.०७/०७/२०२० रोजी समन्स पत्र दिले होते. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही नाही. मी आरोपीला ओळखतो आरोपी माझ्या गावचा रहीवासी आहे. आता मला फोटो दाखविण्यात आला त्यामध्ये माझा फोटो नाही.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दि.०७/०७/२०२० रोजी पोलिसांनी मला सिर्सी येथे बालावुन माझ्यासमक्ष लोखंडी पाते लागलेला व तिन खडे असलेला दांडा जप्त केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मला पोलिसांनी जप्ती पंचनामा वाचुन दाखविला होता व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस दुसरा पंच प्रशांत काळे हा तेथे हजर होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझा ओळखीचा असल्यामुळे व गावचा रहिवासी असल्यामुळे मी त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे ॲड.एस.पी.अहेरराव यांनी उलटतपास नाकारला.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि १५.०३.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड